असा. क्र. २३

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००२

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मार्च १५, २००२/फाल्गुन २४, शके १९२३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.—महाप्रशासक अधिनियम, १९६३ महाराष्ट्र राज्याला लागू करताना, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . ११५-११६

दिनांक ४ मार्च २००२ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १५ मार्च २००२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाप्रशासक अधिनियम, १९६३ महाराष्ट्र राज्याला लागू करताना, यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६३ चा महा. ४५. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाप्रशासक अधिनियम, १९६३, महाराष्ट्र राज्याला लागू करताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाप्रशासक (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००१ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

२. महाप्रशासक अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१), खंड (अ) मध्ये " दोन लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी " दहा लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १० ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (१) मध्ये, " दोन लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी " दहा लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २९ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " दोन लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी येतो, तेथे त्या मजकुराऐवजी " दहा लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३६ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये, " दोन लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी " दहा लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.